# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०–२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल :dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : CA/3945 दिनांक :24/12/2016

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व संलग्नित विधी महाविद्यालये

विषय:– राज्यातील विधी महाविद्यालयास बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियम लागू करण्याबाबत.

संदर्भ:– १) शासन पत्र क्र. विधी–२०१६/प्र.क्र. २४२/मशि–२, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६.

२) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे–०१ यांचे पत्र क्र.उशिसं/विधी/ बीसीआय त्रुटी/१६–१७/मवि–२/१४२७९, दि. १६ डिसेंबर, २०१६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे–०१ यांचे उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ सोबत जोडले आहे. सदर पत्र आपणांस यापूर्वीच प्राप्त झालेले आहे. सदर पत्राचा आशय स्वयंस्पष्ट असून याबाबत आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षण सहसंचालक, शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) मध्यवर्ती इमारत, पुणे–०१ यांच्या कार्यालयास पाठविण्यात यावा. तसेच अहवालाची एक प्रत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सादर करावी.

कळावे,

आपला,

23/12/16

उपकुलसचिव

(शैक्षणिक विभाग)

सोबत: वरीलप्रमणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
Web:www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्रमांक-उशिसं/विधी/बीसीआय त्रुटी/१६-१७/मवि-२/ ९४ २२१५ दिनांक : १६ डिसेंबर, २०१६.

ACADEMIC SECTION
Savitribai Phule Pune University
Date 19 DEC 2016
Inward No. 13192

महत्वाचे -
प्रति,

प्राचार्य,
सर्व विधी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : राज्यातील विधी महाविद्यालयास बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियम लागू करण्याबाबत.**

**संदर्भ : शासन पत्र क्र. विधी-२०१६/प्र.क्र.२४२/मशि-२, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६.**

उपरोक्त संदर्भाधीन विषयी, राज्यातील विधी महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाचे नियमानुसार आवश्यक असणाऱ्या खालील बाबींची विहित कालमर्यादेमध्ये पूर्तता करावी.

१. पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत, शासकीय / अशासकीय अनुदानित / कायम विना अनुदानित विधी महाविद्यालयांनी १:४० या शिक्षक : विद्यार्थी गुणोत्तर प्रमाणात महाविद्यालयांमध्ये शिक्षक नियुक्त करणेबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

२. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या Rules of Legal Education २००८ मध्ये विधी महाविद्यालयांच्या बाबतीत पायाभूत / भौतिक सोयीसुविधांचे अनुषंगाने असलेल्या तरतुदीनुसार आपले विधी महाविद्यालयांमध्ये आवश्यक त्या पायाभूत / भौतिक सोयीसुविधा पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये पुर्ण कराव्यात.

उपरोक्त नमुद बाबींची पूर्तता करणेसाठी तात्काळ कार्यवाही करुन विहित कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठविण्यात यावा.

( डॉ. वि. रा. मोरे )
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे , महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.